महाराष्ट्र शासन
# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

**दिनांक :- २९/१०/२०२१**

## सर्वसाधारण सुचना

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी एम.बी.ए/एम.एम.एस, एम.सी.ए, एम.आर्च, एम.एचएमसीटी, एमई/एम.टेक, एम.फार्मसी/फार्म-डी बीई/बीटेक, बी.फार्मसी, बी. आर्च, बी.एचएमसीटी, थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी, थेट द्वितीय वर्ष फार्मसी, थेट द्वितीय वर्ष एचएमसीटी या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करु इच्छित उमेदवारांकरीता सर्वसाधारण सुचना**

### ०१. ऑनलाईन अर्ज भरणे

### अ) ई पध्दतीने कागदपत्र पडताळणी व अर्ज निश्चिती करणे - (E.FC)

- संकेतस्थळावर दिलेल्या महत्वाच्या दिनांक व वेळापत्रकाप्रमाणेच अर्जदाराने फक्त ऑनलाइन पध्दतीचा उपयोग करुन अर्ज करावा.
- ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराने माहिती पुस्तिका तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या सुचना, प्रवेश अर्ज भरण्याचे युझर मॅन्युअल चे वाचन केल्यास ऑनलाईन अर्ज भरणे सोईस्कर होईल.
- ऑनलाईन अर्जातील माहिती भरताना अचूक भरावी व योग्य ते कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावी. अर्जातील माहिती ई- पडताळणी केंद्र यांनी निश्चित केल्याच्या अगोदर दुरुस्ती करुन घ्यावी.
- ई- पडताळणी केंद्रा चे अर्ज निश्चित केल्यानंतर काही त्रुटी दुरुस्ती असेल तर विहीत पध्दतीत नमुद केल्याप्रमाणे सदर कालावधित प्रक्रिया पुर्ण करावी.
- ई- पडताळणी केंद्रांनी सुचवलेल्या त्रुटींची पूर्तता उमेदवाराने विहीत नमूद वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण करावी.
- उमेदवाराने पासवर्ड व लॉगिन आयडी ही गोपनिय माहिती कोणासोबत सुध्दा शेअर करु नये. तसे केल्यास त्यास तो वैयक्तीक रित्या जबाबदार असेल.
- अर्ज भरताना कुढल्याही टप्यात अडचण आल्यास लॉगीन मध्ये उपलब्ध असलेल्या मॅसेज बॉक्स मधून मॅसेज करावा किंवा संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा.
- ई- कागदपत्र पडताळणी पध्दतीने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांना प्रत्यक्ष ई पडताळणी केंद्रावर जाण्याची आवश्यकता नाही.
- उमेदवाराने अर्ज केल्यापासून संस्थेत प्रवेश निश्चित होईपर्यंत दररोज आपल्या लॉगीनमधील मॅसेज तसेच त्याच्या नोंदणीकृत मोबाईल किंवा ईमेलवर वेळोवळी येणारे मॅसेज वाचावे व उचीत कार्यवाही करावी. सदर उमेदवाराने वेळोवेळी संपुर्ण प्रवेश प्रक्रियेच्या दरम्यान दिलेल्या सुचनेनुसार योग्य कार्यवाही न केल्यास अर्जात त्रुटी राहील्यास संबंधित उमेदवार स्वत: जबाबदार राहील.
- सदर पध्दतीने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने सदर प्रक्रिया पुर्ण न केल्यास अशा उमेदवारांचे अर्ज हे तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये व अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ठ करण्यात येणार नाही याची कृपया उमेदवार व पालकांनी नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी माहिती पुस्तिका वाचावी.

**ब) प्रत्यक्ष सुविधा केंद्रावर जाऊन कागदपत्र पडताळणी व अर्ज निश्चिती करणे. (FC)**

- उमेदवाराला ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संबंधित अभ्यासक्रमासाठी सुविधा केंद्रांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवाराने आपल्या राहण्याच्या ठिकाणापासुन जवळच्या सुविधा केंद्रावर जाऊन राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत दिल्या जाणाऱ्या सुविधेचा लाभ घ्यावा. सदर केंद्रावर भेट देण्यापुर्वी संपुर्ण अर्ज पुर्ण भरल्याची खात्री करुन घ्यावी.
- उमेदवाराने कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर अर्ज निश्चित झाल्याची खात्री करुन घ्यावी व संबंधित केंद्राच्या अधिकारी यांच्या मार्फत अर्ज निश्चित झाल्याची पोच घेण्यात यावी व त्यापुर्वी त्यात त्रुटी नसल्याची खात्री करुन घ्यावी.
- उमेदवाराने अर्ज केल्यापासून संस्थेत प्रवेश निश्चित होईपर्यंत दररोज आपल्या लॉगीनमधील मॅसेज तसेच त्याच्या नोंदणीकृत मोबाईल किंवा ईमेलवर वेळोवळी येणारे मॅसेज वाचावे व उचीत कार्यवाही करावी. सदर उमेदवाराने वेळोवेळी संपुर्ण प्रवेश प्रक्रियेच्या दरम्यान दिलेल्या सुचनेनुसार योग्य कार्यवाही न केल्यास अर्जात त्रुटी राहील्यास संबंधित उमेदवार स्वत: जबाबदार राहील.
- सदर पध्दतीने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराला कोव्हीड -१९ चे नियमांचे काटेकोर पालन करुन अर्ज सादर करावा लागेल सदर प्रक्रिया पुर्ण न केल्यास अशा उमेदवारांचे अर्ज हे तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये व अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ठ करण्यात येणार नाही याची कृपया उमेदवार व पालकांनी नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी माहिती पुस्तिका वाचावी.

**२. तात्पुरती व अंतिम गुणवत्ता यादी: -**

- उमेदवाराने तात्पुरत्या गुणवत्ता यादीत आपली संपुर्ण माहिती जसेकी नाव, लिंग, प्रवर्ग, गुण इत्यादी तपासावी व त्रुटी असल्यास विहीत कालावधीत नमूद पध्दतीने सदर त्रुटींची पुर्तता करावी.
- उमेदवाराने फायनल मेरीट क्रमांक तपासावा. उमेदवाराने केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या कॅप १ पहिल्या फेरीकरीता उपलब्ध असलेल्या प्रवर्गनिहाय जागा संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्यानंतर माहिती करुन घ्याव्यात.

**३. विकल्प अर्ज भरणे: -**

- उमेदवाराने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी स्वत:च्या लॉगिन मधून पाठयक्रम व संस्था यांच्या पसंती क्रम असणारा ऑनलाईन विकल्प नमुना भरणे व त्यास निश्चित करणे.
- एकदा उमेदवाराने संबंधित प्रवेश फेऱ्यांसाठी त्याच्या/तिच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन विकल्प अर्जाची निश्चिती केली की उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत सादर केलेला पर्याय / प्राधान्य बदल करण्याची /रद्द करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**4. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची उमेदवाराने त्याच्या/तिच्या लॉगीनद्वारे स्विकृती करणे.**

क) उमेदवाराला पहिल्या कॅप फेरीमध्ये दिलेली जागा वाटप नियमांनुसार आहे किंवा नाही याची पडताळणी स्वत: करावी. उमेदवारानी स्वत: च्या लॉगीनमधून पात्रता गुण, प्रवर्ग, लिंग, आरक्षण स्वत: चे विशिष्ट आरक्षण इ. संबंधीचे उमेदवारांनी केलेले दावे बरोबर आहेत याची खात्री करुन घ्यावी. तसेच त्याने/तीने दाखल केलेले दाव्यांच्या अनुषंगाने संबंधित कागदपत्रे अपलोड केलेले आहेत याची खात्री करावी.

ग) ज्या उमेदवारास पहिल्या कॅप फेरीमध्ये त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमांकाच्या जागेचे ऑटोफ्रीजड (freezed) वाटप झाले असेल. अशा उमेदवारांनी वाटप झालेली जागा स्वीकारणे आवश्यक आहे व असे उमेदवार जागा-स्विकृती शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणा करतील. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेरीमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील.

घ) ज्या उमेदवारास पहिल्या कॅप फेरीमध्ये त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंती क्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकाच्या जागेचे वाटप झालेले आहे व ती जागा त्याच्या लॉगीनमधून स्वत: फ्रीइड केली आहे. अशा उमेदवारांनी वाटप केलेली जागा स्वीकारणे आवश्यक आहे व असे उमेदवार जागा स्वीकृती शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणा करतील. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेरीमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील. (उमेदवाराने हा पर्याय काळजापुर्वक वापरला पाहिजे)

ड) ज्या उमेदवारांना त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमाकाखेरीज इतर पसंतीक्रमांकाच्या जागेचे वाटप झाले आहे व जे उमेदवार पुढील फेरीमध्ये वरच्या पसंतीक्रमाची जागा मिळण्याकरीता सहभागी होण्यास इच्छुक असतील अशा उमेदवारांनी पहिल्या फेरीमध्ये मिळालेल्या जागेचा "बेटरमेंन्ट" पर्याय निवडून स्वीकार करणे आवश्यक आहे व असे उमेदवार जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणा करतील.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीनंतर जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे आणि आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरुन प्रवेशाची निश्चिती करणे.

**टिप.**

क) उपरोक्त **०४(ग) व ०४ (घ)** नुसार जागा स्विकारलेल्या उमेदवारांनी प्रवेशाच्या निश्चितीकरणासाठी जागावाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे अनिर्वाय आहे.

ख) संस्था आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करेल व उमेदवारांचा प्रवेश ऑनलाईन प्रणालीत संस्थेच्या लॉगीन मधून ताबडतोब अपलोड करेल व उमेदवारांचा प्रवेश ऑनलाईन पृष्ठीसाठी ऑनलाईन प्रणालितून मिळणारी पावती व शुल्क भरल्याची पावती देईल. जर संस्थेला उमेदवाराच्या अर्जाच्या नमूण्यात केलेल्या दाव्याच्या आधारे केलेले जागावाटप व त्याने केलेला दावा योग्य नाही असे आढळल्यास संस्थेने अशा उमेदवाराचा प्रवेश निश्चित करु नये आणि अशा उमेदवाराने त्याच्या लॉगीनमधून ई-पडताळणी पध्दत किंवा प्रत्यक्ष ई-पडताळणी पध्दत यांद्वारे तक्रार/हरकत नोंदवावी.

**कॅप राऊंड ०२**

**केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या कॅप दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागा प्रदर्शित करणे**

- केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या कॅप दुसऱ्या फेरीसाठी उमेदवाराने उमेदवाराच्या लॉगिनमधून पाठयक्रम व संस्था पसंतिक्रम असणारा ऑनलाईन विकल्प नमूना भरणे व त्यास निश्चित करणे.
- वाटप केलेली संस्था आणि पाठयक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या कॅप दुसऱ्या फेरीसाठी तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे.
- प्रवेश प्रक्रियेच्या कॅप दुसऱ्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची उमेदवाराने त्याच्या/तिच्या लॉगीनद्वारे स्वीकृती करणे.
- (टिप: दुसऱ्या फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारांपैकी ज्यांना पहिल्यांदाच जागावाटप झालेले आहे असे सर्व उमेदवार वरील ४(क) नुसार स्वय: पडताळणीनंतर जागेचा स्वीकार करु शकतील. दुसऱ्या फेरीत पहिल्यांदाच जागा वाटप झालेल्या उमेदवारांनी जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणा करावा.)
- केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या कॅप दुसऱ्या फेरीनंतर जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे आणि आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरुन प्रवेशाची निश्चिती करणे.

- (द्वितीय फेरीमध्ये पात्र उमेदवारांपैकी ज्या उमेदवारास प्रथमच जागावाटप करण्यात आले आहे किंवा जागा वाटपात सुधारणा झाली आहे किंवा या फेरीमध्ये जागा वाटपात सुधारणा झाली नाही/आधीच्या वाटप केलेल्या जागेमध्ये कोणताही बदल झालेला नाही. असे जागावाटप अंतिम असेल प्रवेशाच्या पुष्टीकरणासाठी अशा उमेदवारांनी वाटप केलेल्या संस्थेमध्ये वेळापत्रकाप्रमाणे उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

**महत्वाची टिप: -**

१. अंतिम गुणवत्ता यादीमध्ये ज्यांची नावे नोंदली गेली आहेत अशा सर्व प्रकारच्या उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये (कॅपद्वारे) प्रवेशासाठी विचारात घेतले जाईल.

२. संस्थास्तरावरील कोटयामध्ये व कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांत प्रवेश घेण्यास इच्छुक उमेदवारांनी ई-पडताळणी पध्दत किंवा प्रत्यक्ष इ- पडताळणी पध्दत याद्वारे नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरल्याची निश्चिती करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी प्रवेशासाठी संस्थामध्ये स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवरांची गुणवत्तायादी, संस्था पातळीवर संस्थेद्वारे तयार केली जाईल.

२. संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या जागा वाटपाच्या यादीमध्ये उमेदवारांना देऊ करण्यात आलेल्या तात्पुरत्या जागांचे वाटप दर्शविण्यात येईल.

३. ज्या उमेदवारास जागेचे वाटप करण्यात आले असेल अशा उमेदवारांनी तात्पुरते जागावाटप पत्र संकेतस्थळावरुन त्याच्या लॉगीन मधून डाउनलोड करुन घ्यावे.

४. सर्व उमेदवारांची जागा- स्विकृती शुल्क रुपये १०००/- (रुपये एक हजार रुपये फक्त) एवढे आहे. उमेदवाराला जागावाटपावरुन कागदपत्रांच्या पहिल्या स्वयं-पडताळणी दरम्यान जागा स्विकृती शुल्क भरावे लागले. हे शुल्क ना परतावा प्रक्रिया शुल्क आहे. उमेदवारांना जागा स्विकृती शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे लागले.

५. उमेदवार संस्थेत प्रवेश घेण्यासाठी हजर होण्याच्या वेळेस, अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्टयर्थ सर्व मुळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. उमेदवार अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्य पुष्टयर्थ मुळ प्रमाणपत्रे सादर करणार नाही अशा परिस्थित जागा वाटप आपोआप रद्द होईल व ती जागा पुढील फेरीमध्ये वाटपासाठी उपलब्ध होईल. अधिसुचित वेळापत्रकानुसार कागदपत्रांच्या स्वंय-पडताळणीच्या टप्यावर उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे तयार ठेवण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

६. नंतरच्या टप्यात, उमेदवाराने अर्जात केलेल्या खोटया दाव्यावरुन उमेदवाराला जागावाटप झालेली आहे असे आढळल्यास, असे जागावाटप/संस्थेमध्ये घेतलेला प्रवेश आपोआप रद्द होईल.

**मा. आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**